|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ०३ (              ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पूज्य साने गुरुजी संस्कार केंद्राच्या वतीने `श्यामची आई ` या साने गुरुजी लिखित पुस्तकाचा उर्दू अनुवाद प्रकाशित करण्यात आला असून या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार, दि.५ जुलै रोजी विद्यापीठात होत आहे. याच समारंभात कवयित्री दिशा शेख यांचे अनुभवकथन आणि काव्यवाचन देखील होणार आहे.

विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतंर्गत पूज्य साने गुरुजी संस्कार केंद्र कार्यरत आहे. `श्यामची आई ` या पुस्तकाचा उर्दू अनुवाद या केंद्राच्या वतीने प्रकाशित करण्याची योजना काही वर्षांपूर्वी मान्य करण्यात आली होती. औरंगाबाद येथील मौलाना आझाद शिक्षण संस्थेचे संचालक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील माजी बीसीयुडी संचालक प्रा.ए.जी.खान यांनी या पुस्तकाचा उर्दू अनुवाद केला आहे. गुरुवार, दि.५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते होत असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.ए.जी.खान व व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील उपस्थित राहणार आहेत.

या पुस्तक प्रकाशन समारंभाला जोडून एका तृतीय पंथीयाचे अनुभवकथन व काव्यवाचन या कार्यक्रमात कवयित्री दिशा शेख या अनुभवकथन व काव्यवाचन करणार आहेत. सर्वांसाठी खुल्या असलेल्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे व केंद्राचे समन्वयक डॉ.सुनील पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : ०३ जुलै, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून सर्व आवृत्त्यांमध्ये प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी